# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **दि. १८ ऑक्टोबर २०२०**

# मेट्रोच्या बायो-डायजेस्टर वॉटर ट्रीटमेंट प्लान्टची महापौरांनी केली पाहणी

## शहरातील उद्यानांमध्ये लावण्यासंदर्भात विचार

**नागपूर, ता. १८ :** नागपूर मेट्रोच्या साऊथ एअरपोर्ट रेल्वे स्थानकावर उभारण्यात आलेल्या बायो-डायजेस्टर वॉटर ट्रीटमेंट प्रोसेस प्लान्टची पाहणी महापौर संदीप जोशी यांनी रविवारी (ता. १८) केली. नागपूर शहरातील उद्यानांमध्ये हे प्लान्ट उभारता येतील का, यासंदर्भात अभ्यास करून त्याबाबत अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी महापौर संदीप जोशी यांच्यासह घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त डॉ. प्रदीप दासरवार, जलप्रदाय विभागाच्या अधीक्षक अभियंता श्वेता बॅनर्जी, मेट्रोचे जनसंपर्क अधिकारी अखिलेश हळवे तसेच डीआरडीओचे अधिकारी उपस्थित होते.

महामेट्रोच्या वतीने साऊथ एअरपोर्ट रेल्वे स्थानक, मेट्रो भवनसह अन्य काही ठिकाणी बायो डायजेस्टर वॉटर ट्रीटमेंट प्रोसेस प्लान्टची उभारणी डीआरडीओच्या माध्यमातून केली आहे. यामाध्यमातून घाण अथवा वाया जाणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करून ते बागकाम अथवा अन्य कार्यासाठी वापरले जाते. खर्चिक नसलेल्या या प्रकल्पामुळे शुद्ध पाण्याची बचत होते आणि घाण अथवा सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करता येतो. शहरात मनपाची अनेक उद्याने आहेत. शिवाय अनेक क्रीडांगणे आहेत. या उद्यानांसाठी किंवा मैदानांसाठी अशा प्रकारचा प्लान्ट उपयोगी ठरू शकतो. याबाबत अभ्यास करून, शहानिशा करून तातडीने अहवाल सादर करावा, अशा सूचना देत शहरातील किमान दहा उद्यानांमध्ये हा प्लान्ट उभारण्यावर विचार करू, असेही महापौर संदीप जोशी यांनी यावेळी सांगितले.

